नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३४२ | Issue - 342 | वार मंगळवार दि. ५ मे २०२६ | Blow- Tuesday Date 5 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मुरूम वाहतूक करणाऱ्या भरधाव टिपरने एसटी बसला ठोकले; बस मधील ३ प्रवासी ठार

## अनेक जण गंभीर जखमी; दुधनी जवळ सोलापूर आगाराच्या गाणगापूर एसटी बसला अपघात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
महेश गायकवाड/अक्कलकोट

रस्त्याचे काम करण्याच्या कामासाठी मुरूम ची वाहतूक करणाऱ्या आणि अती भरधाव वेगाने जाणाऱ्या टिपर ने स्मरून येणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या एस टी बस ला कट मारून डाव्या साईडने घासले यामुळे झालेल्या भीषण अपघातात खिडकीच्या कडेला बसलेल्या तीन प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला तर बस मधील अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत हा अपघात रुद्देवाडी बस स्टॉप जवळ आज दुपारी २ वाजता घडला अपघात घडल्या नंतर तात्काळ रुद्देवाडी चे तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष दिलीप जामदार यांच्यासह ग्रामस्थानी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन बचाव कार्यात मदत केले.

टिपर ने एस टी बस ला डाव्या बाजूने ठोकरल्या नंतर तो भरधाव वेगाने पुढे जाऊन पलटी झाला आणि मोठ्या प्रमाणावर पेट घेतला. भीषण आग लागल्या मुळे टिपर जाळून खाक झाला आहे. अक्कलकोट अफजलपूर रस्त्याचे सध्या रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असून हा महामार्ग फोर लेन केला जात आहे या कामाचे कंत्राट

**रुद्देवाडी चे ग्रामस्थ तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन जखमी प्रवाशाना तातडीने मदत केली कोणी पाणी आणून पाजले तर कोणी जखमी लोकांना रुग्णालयात नेण्यासाठी तात्काळ रुग्णवाहिका बोलावून घेऊन रुग्णालयात हलविले. एस टी बस गाणगापूर हून अक्कलकोट कडे येत होती तर टिपर भरधाव वेगाने सिन्नूर कडे जात होता. सिन्नूर येथे रस्त्याचे काम सुरू आहे. मृतांमध्ये एका १७ वर्षीय मुलीचा समावेश असून मुलगी चिकेहळी येथील राहणारी आहे तर जागेवरच मृत्यु पावलेला वृद्ध इसम धाराशिव जिल्ह्यातील उंदरवाडी येथील आहे तर एका प्रवाशांची अद्याप ओळख पडली नसल्याचे कळते.**





रत्नागिरी येथील त्रिमूर्ती कन्स्ट्रक्शन या कंपनीने घेतले आहे.अपघात झालेला टिपर हा याच याच कन्स्ट्रक्शन कंपनीचा आहे तो संपूर्ण जळून खाक झाल्यामुळे त्याचा वाहन क्रमांक दिसत नाही तर अपघात झालेल्या एस टी बस चा वाहन क्रमांक एम एच १२ सी यू ३९८३ असा असून एस टी बस सोलापूर आगाराची आहे गाणगापूर हून ती अक्कलकोट कडे निघाली होती दुपार ची वेळ असल्यामुळे प्रवासी हवा येण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवून खिडकी जवळच बसले होते त्यामुळे जखमी प्रवाशांची संख्या मोठी आहे.

सोलापूर-अक्कलकोट महामार्गावरील रूद्देवाडी बसस्थानकाजवळ एसटी बस व मुरूमाने भरलेल्या डंपरचा भीषण अपघात झाला. हा अपघात सोमवारी दुपारी २ वाजण्याच्या सुमारास घडला आहे. या अपघातात दोन ते तीन प्रवाशांचा मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. अपघातानंतर डंपरने पेट घेतला दरम्यान, याबाबत पोलिसांनी सांगितले की, अक्कलकोट होऊन गाणगापूर कडे जाणाऱ्या बसला रुद्देवाडी बसस्थानकाजवळ मुरूमाने भरलेल्या डंपरने समोरून धडक दिली. या धडकेत एसटी बसचे प्रचंड नुकसान झाले आहे. अपघातानंतर पुढे जाऊन डंपर उलटला आणि डंपरने पेट घेतला. बसमधील अनेक प्रवासी किरकोळ तर काही प्रवास गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात दोन ते तीन प्रवाशांचा मृत्यू झाला असून मृत्यूचा आकडा वाढण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे. अपघातात एसटी बस आणि डंपरमधील प्रवासी व चालक गंभीर जखमी झाले. जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

त्यातील जखमी अमीनबी इब्राहिम ओतिहाळ वय ५३ वर्ष राहणार अफजलपुर यांना सोलापूरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोच्च रुग्णालय या ठिकाणी उपचारासाठी पाठवण्यात आले आहे आहे. अपघातानंतर मदतीसाठी ग्रामस्थ धावले. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. जखमींना उपचारासाठी जवळच्या रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

रुद्देवाडी बस स्टॉप जवळ हायवा टिपर ने एस टी बस मधील प्रवाशना चिरडले आणि अपघातानंतर टिपर उलटल्यामुळे पेट घेऊन जळून खाक झाला आहे.

**अपघात घडल्या नंतर मी आणि आमच्या गावचे असंख्य ग्रामस्थ तसेच सिद्धाराम जमादार सोमनाथ शिवशरण करवीर आणि यांनी मिळून तत्काळ घटना स्थळावर जाऊन एस टी बस मधील जखमी लोकांना बाहेर ओढून काढून त्यांना तत्काळ दवाखान्यात पाठवून दिले आणि मृत्यू पावलेल्या लोकांना बस मधून उतरवून खाली घेतले अपघाताची माहिती पोलिसांना कळविले व जखमी लोकांना पाण्याची सोय केली. या अपघाताची माहिती दुधनी चे नगराध्यक्ष प्रथमेश शंकर म्हेत्रे यांना दिली त्यांनीही घटनास्थळी दाखल होऊन जखमी प्रवाशाना उपचार मिळण्यासाठी सर्व सहकार्य केले.**

**– दिलीप जमादार** (माजी महात्मा गांधी तंटामुक्त समिती अध्यक्ष रुद्देवाडी)

# बंगालमध्ये प्रथमच कमळ फुलले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशात सर्वाधिक लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालच्या निकालाचं चित्र आता स्पष्ट होत असून बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जींच्या टीएमसी पार्टीला मोठा धक्का बसला आहे. बंगालमध्ये आता नवा इतिहास लिहिला जातो आहे. बंगालने भाजपला संधी देत नवा अध्यायाची सुरुवात केली आहे. गेली १५ वर्षे सत्तेत असलेल्या ममता दीदी यांच्या तृणमूल काँग्रेसला यंदा मतदारांनी नाकारल्याचं चित्र असून भाजप पहिल्यांदाच याठिकाणी सत्तेत येत आहे. बीजेपीने बंगालमध्ये बहुमताचा टप्पा ओलांडला आहे. १९० पार करत भाजपचा राज्यात मोठा विजय होताना दिसतो आहे. मतदारांचा हा कल म्हणजे ममता दीदींच्या राजकारणाला मोठा धक्का मानला जातो आहे. या अनपेक्षित निकालांमागची कारणे तरी काय हा प्रश्न तुम्हालाही पडला असेल, कारण गेली १५ वर्षे सत्तेचा डोलारा मिरवणाऱ्या टीएमसीला एवढ्या मोठ्या फरकाने पराभवाचा सामना करावा लागेल असं कोणालाही वाटलं नसेल पण आता मात्र नंबर पाहता सत्तेचा हा सारिपाट भाजपच्या बाजून गेला आहे.

पहिल्या कारणाकडे पाहताना राजकीय विश्लेषकांच्या मते यंदाच्या निवडणुकीमध्ये भ्रष्टाचार हा मुद्दा कळीचा ठरला. शिक्षक भरती घोटाळ्यातील आरोपांनी टीएमसीची प्रतिमा मलिन झाली होती. ममता बॅनर्जी यांनी 'लक्ष्मीर भंडार' आणि 'कन्याश्री' सारख्या योजनांच्या माध्यमातून महिला मतदारांना टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला होता पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामागचं कारण म्हणजे सुशिक्षित तरुणांमधील बेरोजगारीचा रोष. हा रोष सरकारी योजनांच्या लाभापेक्षा भारी ठरल्याचे आतपर्यंतच्या निकालांच्या कलांवरुन स्पष्ट होत आहे. ममता दीदी या गेली तीन टर्म सत्तेत होत्या. त्यामुळे सरकारमध्ये असूनही अपेक्षित असे विकासाचे परिणाम न दिसल्याने मतदार नाराज होतेच. खासकरुन ग्रामीण भागातल्या नागरिकांच्या समस्या हा मुख्य मुद्दा होता. याठिकाणी 'सिंडिकेट राज' आणि स्थानिक नेत्यांच्या मनमानीबद्दल वारंवार तक्रारी येत होत्या. ममता दीदी या वैयक्तिकरित्या आजही लोकप्रिय आहेत पण त्यांच्या पक्षातल्या स्थानिक राजकारणाच्या फळी सांभाळणाऱ्यांकडून मात्र त्या तक्रारींचे निवारण करणे शक्य झाले नाही, अशीही चर्चा होती, ज्याचा फायदा भाजपने घेतला. ममता बॅनर्जींनी त्यांच्या सत्तेच्या काळात शेतकरीस कष्टकरी वर्गांसाठी अनेक निर्णय घेतले. पण बंगालमध्ये कोणतेही मोठे उद्योग आणि व्यवसाय आणण्यात त्यांना यश आले नाही, ज्यामुळे रोजगाराचा प्रश्न प्रलंबित राहिला. भाजपने त्यांचा प्रचाराचा जोर याच बाजूने लावला. सोनार बांगला आणि औद्योगिक विकासाच्या मुद्द्यावर केलेल्या प्रचारामुळे शहर आणि निमशहरी भागातला मतदार हा भाजपच्या बाजूने गेला. टीएमसी ही कामाचा पाढा वाचत राहिली आणि दुसरीकडे भाजपने मतदारांना विकासाचे पर्व दाखवून बाजी मारली असे या निकालाच्या कलांचे विश्लेषण अनेकांनी केले आहे. निवडणूक आयोगाची भूमिकाही या निवडणुकीत महत्त्वाची ठरली आहे. मतदार याद्यांमधील दुरुस्ती असेल किवा बोगस मतदारांची नावे काढून टाकल्यामुळे मतदानाची पारदर्शकता वाढली होती. टीएमसीने या सगळ्याला भाजपचे षडयंत्र म्हटले होते. पण निष्पक्ष मतदानामुळे मतांची टक्केवारी आणि सगळीच समीकरणं बददली, असेही काही तज्ज्ञांनी सांगितले.

# सुनेत्रा पवार आणि अक्षय कर्डिले लाखोंच्या मताधिक्याने विजयी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे / अहिल्यानगर : राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निकालानुसार राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत तर अक्षय कर्डिले राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत लाखोंच्या मताधिक्याने विजयी झाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार असलेल्या सुनेत्रा पवार आणि भाजपचे उमेदवार असलेले अक्षय कर्डिले या दोघांच्या दणदणीत विजयामुळे महायुतीने आपल्या दोन्ही जागा राखल्या आहेत. याआधी अजित पवार बारामतीचे तर शिवाजीराव कर्डिले राहुरीचे आमदार होते. पण त्यांच्या निधनामुळे बारामती आणि राहुरी मतदारसंघ रिक्त झाले होते. यामुळेच दोन्ही विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्यात आली.

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटननिवडणुकीत राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्या सुनेत्रा अजित पवार यांना दोन लाख अठरा हजार ९६९ मते मिळाली. सुनेत्रा पवारांचा २४ फेऱ्यांअखेर दोन लाख अठरा हजार ०३४ मतांनी विजय झाला. त्यांनी नवीन राष्ट्रीय समाज पक्षाच्या प्रो. आर. वाय. घुटुकडे सर यांचा पराभव केला. प्रो. आर. वाय. घुटुकडे सर यांना फक्त ९३५ मते मिळाली. तेच या निवडणुकीतले दुसऱ्या क्रमांकाचे उमेदवार ठरले. बारामतीच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून बिग बॉस फेम अभिजीत बिचुकले आणि करुणा धनंजय मुंडे हे पण रिंगणात होते. बिचुकले यांना ३३३ तर करुणा धनंजय मुंडे यांना ३०१ मते मिळाली.

राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटननिवडणुकीत भाजप उमेदवार अक्षय शिवाजीराव कर्डिले यांना एक लाख चाळीस हजार ०९३ मते मिळाली. त्यांचा २७ फेऱ्यांअखेर एक लाख बारा हजार ५८७ मतांनी विजय झाला. त्यांनी गोविंद खंडू मोकाटे या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार अर्थात राशपच्या उमेदवाराचा पराभव केला. गोविंद मोकाटे यांना २७ हजार ५०६ मते मिळाली. तेच या निवडणुकीतले दुसऱ्या क्रमांकाचे उमेदवार ठरले.

**पंढरपूर तीथक्षेत्र विकासासाठी ४१५०.४६ कोटीच्या विकास आराखड्यास शिखर समितीच्या बैठकीत मान्यता**

# पंढरपूर तीर्थक्षेत्राचा समग्र विकास येत्या ३० महिन्यांत पूर्ण करा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पंढरपूर तीथक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत ४१५०.४६ कोटीच्या सर्वसमावेशक आराखड्यास मान्यता देण्यात आली. पंढरपूर हे राज्यातील सर्व धर्मियांचे श्रध्दास्थान आहे. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविकास आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात. पुढील ५० वर्षाचा विचार करुन या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करण्यात येणारी विकास कामे येत्या ३० महिन्यात पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वने मंत्री गणेश नाईक, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान अवताडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे धार्मिक व सांस्कृतिक तीर्थक्षेत्र आहे. येथे दरवर्षी आषाढी, कार्तिकी, चैत्री आणि माघी वारीच्या काळात लाखो वारकरी श्री विठ्ठल-रुक्मिणींच्या दर्शनासाठी येतात. भाविकांची सातत्याने वाढणारी संख्या, रस्ते, वाहतूक आणि अन्य संबंधित बाबी लक्षात घेता पंढरपूर तीर्थक्षेत्र परिसराच्या समग्र व नियोजित विकासाची कामे वेगाने हाती घेण्यात यावीत.

पंढरपूर येथे येणाऱ्या वारकरी व भाविकांना स्वच्छ, गर्दीमुक्त, सुरक्षित आणि आध्यात्मिकदृष्ट्या समाधानकारक अनुभव मिळावा हा विचार करून विकास कामे दर्जेदार, शाश्वत व भविष्याभिमुख पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. यासाठी बाधित निवासी व व्यावसायिक मालमत्ताधारक तसेच भाडेकरूंना योग्य मोबदला तात्काळ देण्यात यावा. भूसंपादनासाठी आवश्यक निधीही त्वरित उपलब्ध करून द्यावा आणि निधीअभावी कोणतेही काम अपूर्ण राहू नये, अशा सूचनाही मुख्यमंत्री यांनी यावेळी दिल्या.

सोलापूर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी बैठकीत सादर केलेल्या प्रस्तावानुसार गर्दी व्यवस्थापनासाठी कॉरिडॉर उभारणी, पुरातन मंदिर व मठांचे जतन-संवर्धन, बाधितांना व्यावसायिक संधी आणि वारकऱ्यांसाठी समग्र सुविधा विकास यासाठी ७३५.८० कोटी रुपयांचा आराखडा मांडण्यात आला. तसेच नगर प्रदक्षिणा मार्ग विकास, नदी घाट सुशोभीकरण, वाहनतळ व व्यापारी संकुल, शहर सुशोभीकरण, रस्ते व पूल आणि पालखी तळांच्या विकासासाठी १३८७.९१ कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला. याशिवाय भूसंपादन व पुनर्वसन खर्च, बाधित इमारतींचा मोबदला आदींसाठी २०२६.७५ कोटी रुपयांचा प्रस्ताव मांडण्यात आला. असा एकूण ४१५०.४६ कोटी रुपयांच्या या सर्वसमावेशक आराखड्यास मुख्यमंत्री फडणवीस यांनी आजच्या शिखर समितीच्या बैठकीत मान्यता दिली.

## संपादकीय....

# दे धक्का

देशात सर्वाधिक लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालच्या निकालाचं चित्र स्पष्ट झाले आहे. बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जींच्या टीएमसी पार्टीला मोठा धक्का बसला आहे. बंगालने भाजपला संधी देत नवा अध्यायाची सुरुवात केली आहे. गेली १५ वर्षे सत्तेत असलेल्या ममता दीदी यांच्या तृणमूल काँग्रेसला यंदा मतदारांनी नाकारले आहे. भाजप पहिल्यांदाच याठिकाणी सत्तेत येत आहे. बीजेपीने बंगालमध्ये बहुमताचा टप्पा ओलांडला आहे. १९० पार करत भाजपचा राज्यात मोठा विजय होताना दिसतो आहे. मतदारांचा हा कल म्हणजे ममता दीदींच्या राजकारणाला मोठा धक्का मानला जातो आहे. या अनपेक्षित निकालांमागची कारणे तरी काय हा प्रश्न तुम्हालाही पडला असेल, कारण गेली १५ वर्षे सत्तेचा डोलारा मिरवणाऱ्या टीएमसीला एवढ्या मोठ्या फरकाने पराभवाचा सामना करावा लागेल असं कोणालाही वाटलं नसेल पण आता मात्र नंबर पाहता सत्तेचा हा सारिपाट भाजपच्या बाजून गेला आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते यंदाच्या निवडणुकीमध्ये भ्रष्टाचार हा मुद्दा कळीचा ठरला. शिक्षक भरती घोटाळ्यातील आरोपांनी टीएमसीची प्रतिमा मलिन झाली होती. ममता बॅनर्जी यांनी 'लक्ष्मीर भंडार' आणि 'कन्याश्री' सारख्या योजनांच्या माध्यमातून महिला मतदारांना टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला होता पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्यामागचं कारण म्हणजे सुशिक्षित तरुणांमधील बेरोजगारीचा रोष. हा रोष सरकारी योजनांच्या लाभापेक्षा भारी ठरल्याचे आतपर्यंतच्या निकालांच्या कलांवरुन स्पष्ट होत आहे.

# 'एकत्रित आयुष्मान भारत : आरोग्य सेवेला वेग

'एकत्रित आयुष्मानभारत - प्रधानमंत्री जन आरोग्य व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य' योजनेचे काम काज राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या 'टीएमएस २.०' या प्रगत संगणक प्रणालीवर आल्यामुळे आरोग्य सेवेला वेग, पारदर्शकता व उपचारसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. ही प्रणाली रुग्णाच्या बायोमॅट्रीक उपस्थितीची नोंद घेणे, कृत्रिम बुद्धिमतेवर आधारित गैरप्रकार रोखणारी यंत्रणा, तसेच संपूर्ण ऑनलाईन पारदर्शक आधुनिक संगणकीय प्रणाली आहे. तसेच ही प्रणाली लागू झाल्यापासून उपचारांच्या संख्येत १३५६ वरुन २३९९ पर्यंत वाढही झालेली आहे.

ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करुन आयुष्मान कार्ड मंजूर होण्यापर्यंतचा बहुमूल्य वेळ वाचविता यावा यासाठी नागरिकांनी आयुष्मान कार्ड तयार करुन घ्यावे, असे आवाहन करण्यात आलेआहे. आयुष्मान कार्ड तयार करण्याची कार्यपद्धती अत्यंत सोपी असून लाभार्थी आयुष्मान ॲपद्वारे किंवा https://beneficiary.nha.gov.in/ या संकेतस्थळावरून स्वतःचे कार्ड स्वतः तयार करू शकतात किंवा कोणत्याही आशा सेविका, रेशन दुकानदार आणि आपले सरकार सेवा केंद्र येथूनही आपले कार्ड तयार करून घेऊ शकतात. पुढील तीन दिवसापर्यंत ई-केवायसीसह रुग्ण नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन घेण्याची मुभा रूग्णालयांना देण्यात आली आहे. या कालावधीत रुग्णास उपचार नाकारले जाणे किंवा पैशांची मागणी करण्यात आल्याच्या तक्रारी आल्यास संबंधित आरोग्यमित्र, योजनेचे जिल्हा समन्वयक आणि प्रादेशिक व्यवस्थापक यांनी रुग्णास तात्काळ मदत करून ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करून घेण्याबरोबरच निःशुल्क उपचार त्वरित सुरू करून घेण्यासाठी सहाय्य करावे, अशाही सूचना देण्यात आल्या आहेत. यासाठी प्रत्येक रुग्णालयात नियुक्त आरोग्यमित्र आणि योजनेचे क्षेत्रीय व्यवस्थापक व जिल्हा समन्वयक यांचे दूरध्वनी क्रमांक रुग्णालयातील योजनेच्या कक्षात प्रदर्शित करण्यात आले असून त्यांना संपर्क साधून मदत घेता येईल. तसेच राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या supportjeevandayee.gov.in या ईमेलवर किंवा टोल फ्री क्रमांक १५५३८८/१८००२३३२२००, १४५५५/१८००१११५६५ यावर संपर्क साधता येईल.

# 'वर्क फ्रॉम व्हिलेज' च्या माध्यमातून ग्रामीण भारताचे आर्थिक सबलीकरण शक्य : पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर

## स्वेरीत 'अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर - स्वेरी'चे थाटात उद्घाटन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - 'संकल्पनेपासून ते शेवटच्या ग्राहकापर्यंत एखादी गोष्ट पोहोचवण्याचा प्रवास म्हणजेच इनोव्हेशन होय. औद्योगिक युगात 'शहराकडे चला' अशी मानसिकता निर्माण झाली होती, मात्र आजच्या ज्ञानयुगात 'डिजिटल तंत्रज्ञाना'मुळे 'वर्क फ्रॉम होम' प्रमाणेच 'वर्क फ्रॉम व्हिलेज' ही संकल्पना प्रत्यक्षात साकारता येणे शक्य आहे. ग्रामीण भागातील तरुणांना शहराप्रमाणे साधने उपलब्ध करून दिल्यास देशाची आर्थिक विषमता कमी होऊन खऱ्या अर्थाने प्रगती साधता येणे शक्य आहे. इनोव्हेशन पुढे नेण्यासाठी पूरक वातावरण निर्मिती करणे आवश्यक असून शहरापेक्षा ग्रामीण भागात इनोव्हेशन इकोसिस्टम निर्माण करणे अवघड आहे. पण, हे करणे महत्वाचे आहे. यामुळे एसीआयसीच्या माध्यमातून ग्रामीण भागाचे शिक्षणाद्वारे सबलीकरण होईल.' असे प्रतिपादन विख्यात अणुशास्त्रज्ञ तथा भारतीय अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांनी केले. गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये आयोजिलेल्या 'अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर-स्वेरी (एसीआयसी - स्वेरी)' या केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी पद्मविभूषण डॉ. काकोडकर हे उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे हे होते. महाराष्ट्र गीत, स्वेरी गीत व दीपप्रज्वलनानंतर प्रास्तविकात स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस), पंढरपूरचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी सर्वांचे स्वागत करून स्वेरीने ग्रामीण भागात इनोव्हेशन इकोसिस्टम तयार करण्यासाठी घेतलेला पुढाकार, नीती आयोगाचे सहकार्य, संशोधन विभागाची गरुड झेप आदी बाबत सविस्तर माहिती दिली. एसीआयसी चे सल्लागार व सोबस इन्साईट फोरमचे संस्थापक दिग्विजय चौधरी म्हणाले की, 'चांगले उद्योजक निर्माण करण्यासाठी चांगले मार्गदर्शन करणे आवश्यक असते. यासाठी मार्केटिंग व उत्पादनात वाढ या संबंधित बाबींचे या केंद्रातून मार्गदर्शन होईल.' असे सांगितले. एसीआयसी - स्वेरीचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष भुतडा यांनी 'एसीआयसी - स्वेरी या केंद्राचे मुख्य उद्देश, उद्योजक, शेतकरी व्यावसायिक यांना मालाच्या उत्पादनापासून बाजारपेठेपर्यंतच्या बाबी सविस्तरपणे सांगितल्या. व्हील्स ग्लोबल फौंडेशन, इंडीयाचे महेश वैद्य यांनी 'इनोव्हेशन व प्रोडक्ट डेव्हलपमेंट' याविषयी माहिती दिली. सल्लागार रेशा पटेल म्हणाल्या की, 'कोणतेही कार्य एकत्रितरीत्या केल्यास यश झपाट्याने मिळते यासाठी महिलांनी पुढाकार घेवून कार्य करणे आवश्यक आहे.' उद्घाटक पद्मविभूषण डॉ. काकोडकर पुढे म्हणाले की, 'इनोव्हेशनची सुरुवात ही तळागाळातील माणसांच्या गरजांमधून होते. भारताची मोठी लोकसंख्या असून ग्रामीण भागातील तरुणाई हीच आपली सर्वात मोठी जमेची बाजू आहे. युवकांच्या माध्यमातून नवनवीन संकल्पना प्रत्यक्षात साकार करता येतील. यातून केवळ शहरांचे उदात्तीकरण करण्यापेक्षा ग्रामीण भागातच उत्पादनाची साधने विकसित करणे ही काळाची गरज आहे. स्वेरीत शिक्षण घेतलेला विद्यार्थी पुढे मोठमोठ्या औद्योगिक शहरात जातो आणि तेथील उद्योग-व्यवसाय वाढीसाठी प्रयत्न करतो. त्यापेक्षा पंढरपूर मध्ये औद्योगिक वसाहत निर्माण झाल्यास याच विद्यार्थ्यांच्या माध्यमातून पंढरपूर सारख्या ग्रामीण भागाचा विकास झपाट्याने होईल. ज्या ठिकाणी आर्थिक विषमता कमी होते तेथील विकास झपाट्याने होतो. एकूणच स्वेरीतील एसीआयसी केंद्र भविष्यात अनुकरणीय मॉडेल बनेल.' असा विश्वास डॉ. काकोडकर यांनी व्यक्त केला. अध्यक्ष स्थानावरून बोलताना आमदार समाधान आवताडे म्हणाले की, 'देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली संशोधन क्षेत्रात विशेष निधी उपलब्ध करून दिला असून या माध्यमातून संशोधन झाले पाहिजे यासाठी नाविन्यपूर्ण विचार पुढे येण्याची गरज आहे. कमी वेळेत उत्कृष्ट दर्जाचे उत्पादन झाल्यास निश्चितपणे स्वप्नातील भारत अवतरणार आहे. भारताच्या जडणघडणीत शास्त्रज्ञ डॉ.काकोडकर यांचा मोलाचा वाटा आहे. जर देशाची पाच ट्रीलीयन डॉलर इकॉनॉमी करायची असेल तर नवनवीन तंत्रज्ञान, प्रयोगांची निर्मिती, संशोधन झाले पाहिजे. संशोधन केंद्र, बचत गट, याद्वारे उद्योजक तयार व्हावेत. एकूणच एसीआयसी - स्वेरी या केंद्राच्या माध्यमातून झालेल्या संशोधनातून एका नालंदा विद्यापीठाच्या प्रतिकृती निर्मिती करणे ही आहे. या केंद्रामुळे ग्रामीण भागातील तरुणांमध्ये असलेल्या कल्पकतेला मोठी चालना मिळणार आहे. हे मात्र नक्की ! म्हणून तुम्ही केंद्राच्या माध्यमातून कार्य करत रहा, आवश्यक असेल त्या ठिकाणी आम्ही प्रशासनाच्या माध्यमातून पाठपुरावा करू.' असे सांगून आमदार आवताडे यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण भाषण दिले. यावेळी सौ. सुयशा काकोडकर, डॉ. जान्हवी गांगल, तन्मय मुखर्जी, अनघा पाठक, महेश पाठक, शरद भोसले, स्वप्नील कांबळे, आर्ट ऑफ लिव्हिंगचे डॉ. माधव पोळ, कामगार आयुक्त दत्ता पवार, पांडुरंग साखर कारखान्याचे संचालक दिलीप गुरव, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वंदना बीडकर, अनिता पवार, विलास मस्के, आर्किटेक्ट यादगिरी कोंडा, शेतकरी, महिला बचत गटातील महिला वर्ग, प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी, स्वेरीचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, माजी अध्यक्ष व विश्वस्त प्रा. सी. बी. नाडगौडा, धनंजय सालविठ्ठल, विश्वस्त एन. एम. पाटील, विश्वस्त एच. एम.बागल,विश्वस्त बी.डी. रोंगे, स्वेरी अंतर्गत असलेल्या पाचही महाविद्यालयांचे प्राचार्य, उपप्राचार्या, अधिष्ठाता, विभागप्रमुख, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या केंद्रासाठी डॉ. हर्षवर्धन रोंगे हे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. सूत्रसंचालन डॉ. नीता तळवलकर यांनी केले तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार यांनी आभार मानले.

**यापूर्वी स्वेरीने रुरल डेव्हलपमेंट केंद्र, वायफाय यंत्रणा आणि लगतच्या पाच शाळांना तंत्रज्ञानाने जोडून जी इकोसिस्टम उभी केली आहे, ती खरोखर खूप कौतुकास्पद असून संशोधन क्षेत्रात हा एक इतिहास होता. स्वेरी नावातील आर (रिसर्च) हेच सर्व सांगून जातो. स्वेरीत बोलण्यापेक्षा कामातून अधिक कार्य जाणवते. त्यामुळे या ठिकाणी अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर या केंद्राची स्थापना करण्यात आली. एकूणच ज्या प्रॉब्लेमच्या आधारे प्रश्न सुटतील तेच खरे संशोधन.**

**-डॉ. अनिल काकोडकर, अणुशास्त्रज्ञ, भारत.**

**नीती आयोग व व्हील्स ग्लोबल फाऊंडेशन यांच्या सहकार्याने सुरु झालेल्या या 'अटल कम्युनिटी इनोव्हेशन सेंटर - स्वेरी'च्या उदघाटनाला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. तरीही याचे स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ.एम.एम. पवार यांचे नेतृत्वाखाली स्वेरीमध्ये उत्तम पद्धतीने नियोजन केले होते. त्यामुळे जिल्ह्यातून आलेल्या शेतकरी, पालक वर्ग यांचे भोजनापासून ते प्रस्थानापर्यंतच्या सर्व गोष्टी व्यवस्थित पार पडल्यामुळे सर्वजण समाधानाने परतले.**

# महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त भाजपा प्रभाग १२३ व १२४ च्या वतीने मनपा सफाई कामगारांचा सन्मान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज); महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त भाजपा प्रभाग क्रमांक १२३ व १२४ च्या वतीने पार्कसाईट जांभळी नाका येथील भाजपा कार्यालय येथे भाजपा ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे यांनी मनपा सफाई कर्मचारी यांचे स्वागत त्यांचा सन्मान केला.

शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी महापालिकेचे कर्मचारी अहोरात्र झटत असतात. त्यांचे हे योगदान लक्षात घेऊन या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी महाराष्ट्राच्या राज्य गीताचे सामूहिक गायन करण्यात आले.तसेच महाराष्ट्र दिनानिमित्त जनतेला लाडू वाटप करण्यात आले.या आयोजित कार्यक्रमाला उमेश कोठावदे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी मंडळ अध्यक्ष पार्कसाईट संतोष गांजले,१२४ चे वॉर्ड अध्यक्ष दत्ता सोनवणे,१२३ चे वॉर्ड अध्यक्ष महेश गुप्ता तसेच कार्यकर्ते पदाधिकारी कामगार वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रसिद्ध समाजसेवक केतन भोज समाजभूषण पुरस्काराने सन्मानित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: (प्रतिनिधी) : लघुपट निर्माते, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारे प्रसिध्द अभिनेते, दिग्दर्शक महेश्वर भिकाजी तेटांबे यांच्या 'आर्यारवी एंटरटेनमेंट' आयोजित चौथ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाचा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच परेल येथील शिरोडकर हायस्कूलमध्ये अत्यंत उत्साहात पार पडला.

या महोत्सवात त्यांच्या संबंधित क्षेत्रातील बहुमूल्य योगदानाबद्दल 'भीमराव पांचाळे (प्रसिद्ध गझल गायक - गझल नवाज), सतीश पुळेकर (ज्येष्ठ अभिनेते व दिग्दर्शक),के. राघवकुमार (ज्येष्ठ नाट्यकर्मी) आणि प्रभाकर तोडणकर (ज्येष्ठ समाजसेवक) यांना जीवनगौरव पुरस्काराने' गौरविण्यात आले: कार्यक्रमाचा शुभारंभ सुनील शिर्के (संस्थापक, शिर्के जनकल्याण प्रतिष्ठान) यांच्या हस्ते नारळ वाढवून आणि मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला. कवी शब्दश्री विलास देवळेकर यांनी सादर केलेल्या भारदस्त 'गाऱ्हाण्याने' सोहळ्याची मंगलमय सुरुवात झाली. आयोजक महेश्वर भिकाजी तेटांबे यांनी आपल्या प्रास्ताविकातून महोत्सवाचा उद्देश स्पष्ट केला, तर एका व्हिडिओ फितीच्या (त) माध्यमातून या सोहळ्याचा तीन वर्षांचा प्रवास उलगडण्यात आला. याप्रसंगी धडाडीचे तरुण तडफदार पत्रकार आणि समाजसेवक केतन भोज यांचा समाजाप्रती त्यांनी दिलेल्या भरीव योगदानाबद्दल प्रमुख मान्यवरांच्या हस्ते समाजभूषण पुरस्काराने सन्मान करण्यात आला. या सोहळ्यात नृत्यांगना कु. ग्रीष्मा वहाळकर यांच्या सादरीकरणाने रंगत आणली. प्रसिद्ध अभिनेते व मुलाखतकार मयूर धुरी यांनी आपल्या ओघवत्या शैलीत प्रभावी सूत्रसंचालन केले. व्यासपीठावर अभिनेते कांचन पगारे, अभिनेत्री सिद्धी कामथ, गुरुनाथ तिरपणकर, उद्योजक खलील शिरगावकर, लेखक-दिग्दर्शक अनंत सुतार आणि अभिनेत्री लक्ष्मी गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी महेश्वर तेटांबे यांनी भावूक होत सर्वांचे आभार मानले. राष्ट्रगीताने या सोहळ्याची सांगता झाली.

# जिद्द आणि चिकाटीचे मूर्तिमंत उदाहरण: 'झी कन्नड सारेगमप' फेम दिव्यांग गायक रेवणसिद्ध फुलारी बारावीत यशस्वी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट (प्रतिनिधी) : शारीरिक दिव्यांगत्वावर मात करत आणि संकटांना संधीत रूपांतरित करत, तोळणूर येथील श्री सिद्धरामेश्वर उच्च माध्यमिक प्रशालेचा विद्यार्थी आणि प्रसिद्ध गायक रेवणसिद्ध पुंडलिक फुलारी याने बारावीच्या परीक्षेत ५६.३३% गुण मिळवून उज्वल यश संपादन केले आहे. झी कन्नड 'सारेगमप' या सुप्रसिद्ध सिंगिंग रियालिटी शोमध्ये टॉप फोरपर्यंत मजल मारणाऱ्या रेवणसिद्धने शिक्षणातही आपली चमक कायम ठेवली असून, सर्व स्तरातून त्याचे अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेली यंदाची परीक्षा अत्यंत कडक आणि कॉपीमुक्त वातावरणात पार पडली.

या आव्हानात्मक परिस्थितीत रेवणसिद्धने लेखनिकाच्या साहाय्याने परीक्षा दिली होती. विशेष म्हणजे, या शाळेतील परीक्षेला बसलेल्या ३० विद्यार्थ्यांपैकी केवळ ६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्यात रेवणसिद्धने स्थान मिळवून आपली अभ्यासातील जिद्द सिद्ध केली आहे. यापूर्वी त्याने दहावीच्या परीक्षेतही ८८% गुण मिळवून यश मिळवले होते.

**मोठ्या अधिकारी होण्याचे स्वप्न**

आपल्या यशाबद्दल बोलताना रेवणसिद्ध म्हणाला, बारावी उत्तीर्ण होण्याचे महत्त्व मला या निकालावरून समजले आहे. माझ्या कुटुंबाने आणि शिक्षकांनी मला नेहमीच प्रोत्साहन दिले. माझे स्वप्न एक मोठा अधिकारी होण्याबरोबर देशातील सुप्रसिद्ध गायक होणार असून, त्यासाठी मी माझे शिक्षण आणि संगीत शिक्षण अखंडित सुरू ठेवणार आहे. माझ्या यशाचे श्रेय मी माझ्या गुरुजनांना आणि लेखनिक म्हणून मदत करणाऱ्या प्रसाद रामतीर्थ याला देतो.

रेवणसिद्धला वर्गशिक्षक वैभव पोतदार, रेणुकाचार्य हिरेमठ, रेवणसिद्ध मणूरे, शिवानंद करजगी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्रशालेचे प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड, प्रकाश अतनुरे, हमीद नदाफ, काशिनाथ चलगेरी, माणकोजी मॅडम,पवार सर,यशवंत हरळय्या सर तसेच शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. एका दिव्यांग कलाकाराने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळवलेल्या या यशाचे परिसरात कौतुक होत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आत्मविकासातून डिजिटल युगासाठी सक्षम होण्याची सुवर्णसंधी : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

## 'टेक-वारी २.०''महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह;टेक वारी उपक्रमात 'लेफ्ट ब्रेन' आणि 'राईट ब्रेन' या दोन्हींच्या विकासावर भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी सतत शिकत राहणे आवश्यक आहे. 'टेक-वारी २.०मधून केवळ तांत्रिक ज्ञान नव्हे, तर आत्मविकास, कार्यक्षमता आणि आधुनिक दृष्टिकोन विकसित करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. वारकऱ्यांची पंढरपूरकडे जाणारी वारी जशी शिस्त, श्रद्धा आणि एकात्मतेचे प्रतीक आहे, त्याचप्रमाणे टेक वारी ही प्रशासनाची तंत्रज्ञानाकडे वाटचाल दर्शवणारी चळवळ आहे. भविष्यात नागरिक-केंद्रित आणि सक्षम शासन घडवण्यासाठी ही वारी महत्त्वाची ठरणार आहे.

मागील वर्षीच्या टेक वारी उपक्रमाने तंत्रज्ञानाबाबत जागरूकतेचा भक्कम पाया घातला असून, हा उपक्रम केवळ तंत्रज्ञानाची ओळख नसून, मानव संसाधन विकासाची व्यापक चळवळ आहे.महाराष्ट्राने साधना सप्ताह उपक्रमात देशात प्रथम क्रमांक मिळवल्याचा उल्लेख करत त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच, मिशन कर्मयोगी अंतर्गत दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणामध्ये महाराष्ट्र देशातील अव्वल राज्यांमध्ये असल्याचा अभिमान त्यांनी व्यक्त केला.डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे शासन आणि नागरिकांमधील संवाद अधिक सोपा झाला असून, एआयमुळे सेवा वितरण आणि तक्रार निवारण प्रक्रियेत मोठे बदल घडत असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल म्हणाले, टेक वारी उपक्रमात 'लेफ्ट ब्रेन' आणि 'राईट ब्रेन' या दोन्हींच्या विकासावर भर देण्यात आला आहे. तंत्रज्ञान, एआय, भाषा आणि प्रोजेक्ट मॅनेजमेंट यांसारख्या विषयांद्वारे विश्लेषणात्मक क्षमतेचा विकास केला जात असून, संगीत, योग, नृत्य आणि संस्कृतीसारख्या उपक्रमांमधून सर्जनशीलता आणि मानसिक स्वास्थ्य वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. प्राचीन काळातील 'पुष्पक विमान' ही संकल्पना आजच्या एआय-सक्षम आणि स्वयंचलित तंत्रज्ञानाचीच उदाहरण आहे. सायबर सुरक्षा आणि डिजिटल सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. टेक वारी टूच्या माध्यमातून या सर्व विषयांवर सखोल चर्चा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अपर मुख्य सचिव व्ही.राधा प्रास्ताविकात म्हणाल्या की, 'टेक-वारी २.०' या प्रशिक्षण उपक्रमात ६ हजार कर्मचारी प्रत्यक्ष सहभागी होत आहेत. तसेच या कार्यक्रमांचे राज्यभरातील नऊ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांसाठी प्रत्येक सत्राचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. या पाच दिवसांच्या कार्यक्रमात मंत्रालयात डिजिटल गव्हर्नन्स, डीपीडीपी कायदा, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, क्वांटम कॉम्प्युटिंग, जनरेटिव्ह एआयचा प्रत्यक्ष अनुभव, सायबर सुरक्षा, प्रशासनातील नीतिमत्ता तसेच केंद्र सरकारच्या प्लॅटफॉर्म्स या विषयांवर तज्ज्ञांची सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. या पाच दिवसांत 'तालरंग', 'नादरंग', 'योगरंग', 'कलारंग' आणि 'संस्कृतीरंग' असे पाच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत असे त्यांनी सांगितले.

एआय एंजट वासुदेव हा नाविन्यपूर्ण प्रयोग या कार्यक्रमात वापरण्यात आला.एआय एजंटने प्रेक्षकांशी संवाद साधला व त्यांनी कार्यक्रमाची पूर्ण माहिती प्रेक्षकांना दिली. टेक वारीच्या स्मरणिकेचे ही स्वरूपात प्रकाशन करण्यात आले.

फ्रंट लाईन कर्मचारी यांचा गौरव यावेळी मंत्रालयातील फ्रंट लाईन कर्मचारी पल्लवी सतीश सावंत,नितीन गुरसाळे, मारुती मदने, रेश्मा जाधव, राहुल वाघमारे, अशोक जाधव, प्रतीक गायकरवाड, संजय कळमरकर यांचा सत्कार करण्यात आला. 'तालरंग'च्या कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

# अखंड सेवेचा ध्यास घेतल्याने संतोष पराणे सेवा सन्मान पुरस्काराचे मानकरी : नगरसेवक महेश इंगळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शहर व तालुक्यातील अनेक सामाजिक उपक्रमात संतोष पराणे यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या अंगी असलेल्या सेवाभाव तत्वामुळे अनेक संत महात्म्यांशी त्यांचे ऋणानुबंध जुळले आहेत. त्यांचा सेवाभाव व नम्र स्वभाव पाहून अनेक नागरीकांशी त्यांचे जिव्हाळ्याचे नाते आहेत. या माध्यमातून संतोष पराणे यांनी ही अखंड सेवेचा ध्यास आत्मसात केलं आहे म्हणून अखंड सेवेचा ध्यास घेतल्याने संतोष पराणे सेवा सन्मान पुरस्काराचे खरे मानकरी असल्याचे मनोगत येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा नगरसेवक व स्विमींग ग्रुपचे संस्थापक महेश इंगळे यांनी व्यक्त केले. नुकतेच कर्नाटक येथील शिवलिंगेश्वर विरक्त मठ मादन हिप्परगा यांच्या वतीने संतोष पराणे यांना चालू सालातील सेवा सन्मान पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.



**सेवा सन्मान पुरस्कार प्रित्यर्थ संतोष पराणे यांचा स्विमींग ग्रुपच्या वतीने महेश इंगळे यांनी केला सत्कार**

मठाधीश म.नि.प्र.श्री.अभिनव शिवलिंग स्वामीजी व अक्कलकोट विरक्त मठाचे श्री.म.नि.प्र.बसवलिंग स्वामीजी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देवून संतोष पराणे यांचा सन्मान करण्यात आला. या सेवा सन्मान पुरस्कारा प्रित्यर्थ स्विमींग ग्रुपच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून नगरसेवक महेश इंगळे यांनी संतोष पराणे यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी महेश इंगळे बोलत होते.

यावेळी स्विमिंग ग्रुपचे प्रथमेश इंगळे, ओंकार उटगे, खाजप्पा झंपले, संतोष जवळगे, अंकुश केत, चंद्रकांत सोनटक्के, रमेश शिंदे, विद्याधर गुरव, प्रथमेश इंगळे, मल्लिनाथ माळी, अशोक कलशेट्टी सर, कुमार हत्तुरे, रमेश कणमुसे, सचिन किरनळ्ळी, शशिकांत पराणे, हनुमंत माळी, अरविंद पाटील, बाबा सुरवसे, सिद्धाराम बिडवे, शैलेश राठोर, सुनील पवार, अमर पाटील, मनोज जगताप, सुरेश पाटील, प्रसन्न हत्ते, प्रसाद पाटील, विश्वनाथ देवरमनी, अमर पाटील, शैलेश राठौर, शिवशरण अचलेर, रफिक पठाण, दत्ता कटारे, समर्थ पराणे, हर्षल माळी, तन्मय इचगे, श्रीकांत झिपरे, रमेश शिंदे सर इत्यादी उपस्थित होते.

# खासदार प्रणिता शिंदे यांचा मंगळवेढा दौरा; गावोगावी भेटीतून समस्या जाणून तात्काळ निपटाऱ्यांचा प्रयत्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्याच्या लोकप्रिय खासदार मा प्रणिता शिंदे यांचा सोमवार दिनांक चार मे २०२६ रोजी मंगळा तालुक्यात विविध भागात गावात दौरा आयोजित करण्यात आला आहे ह्या दौऱ्याच्या त्या ग्रामस्थांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणार असून संबंधित शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तात्काळ निपटणार करणार भर देणार आहेत.

दौऱ्याचे सुरुवात सायंकाळी पाच वाजता लक्ष्मी दहिवडी येथे आहे यात्रेनिमित्त देवीच्या दर्शनाने होणार आहे त्यानंतर सायंकाळी साडेपाच वाजता खुपसंगी येथे गाव भेट सायंकाळी साडेसहा वाजता जुनोनी येथे सायंकाळी सात वाजता खडकी येथे तलावात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबास सांत्वन पर भेट देण्यात येणार आहे या दौऱ्याच्या वेळी विविध खात्याचे शासकीय अधिकारी सोबत असणार असल्यामुळे ग्रामस्थांच्या समस्या जागेवरच सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे त्यामुळे नागरिकांनी आपली निवेदने लेखी स्वरूपात तयार ठेवावीत असे आव्हान मंगळवेढा काँग्रेस कमिटी व महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे या दौऱ्यामुळे तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# एमआयटी ज्युनियर कॉलेजच्या विद्यार्थ्यांची बारावी परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : वाखरी येथील माईर्स एमआयटी पुणे संचालित विश्वशांती गुरुकुल ज्युनियर कॉलेजचा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या (क्हड) परीक्षेत वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के व विज्ञान शाखेचा निकाल ९७.८२ टक्के लागला आहे. वाणिज्य शाखेतील पियुष साळुंखे याने ९६ टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे. त्याने अकाउंट्स व गणित विषयांत १०० पैकी १०० गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सायली ढेकळे हिने ९३.६७ % गुण मिळवत द्वितीय तर तन्वी खपाले ८९ % गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला आहे. याशिवाय इतर गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये पारस शेठ ८७.१७ %, सोहम बहुरूपी ८७ %, प्रवीण चौधरी ८७%, ओंकार लगड ८६.३३ % आणि परिनिता आवताडे ८६ % यांनीही विशेष प्राविण्य मिळवत अभिमानास्पद कामगिरी केली आहे. कनिष्ठ महाविद्यालयाच्या या यशाबद्दल हेडमिस्ट्रेस शिबानी बॅनर्जी, प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ तसेच शिक्षक व व्यवस्थापनाने सर्व यशस्वी विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन केले आहे. महाविद्यालयाने नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला असून, विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे प्रभावी मार्गदर्शन आणि पालकांचा पाठिंबा यामुळेच विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले असल्याचे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ यांनी सांगितले.

# अक्कलकोटमध्ये उन्हाचा पारा चढला, वयोवृद्ध घराबाहेर पडणे टाळावे

## नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावे : वैद्यकीय अधीक्षक डॉ.अशोक राठोड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट/:प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यात सध्या उन्हाचा तडाखा वाढला असून तापमानाचा पारा मोठ्या प्रमाणावर चढला आहे. वाढत्या उष्णतेचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अशोक राठोड यांनी नागरिकांना आरोग्याची विशेष काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

डॉ.अशोक राठोड यांनी दिलेल्या माहितीनुसार, सध्या उन्हाची तीव्रता अधिक असल्याने नागरिकांनी दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे. कामानिमित्त बाहेर पडणे अत्यावश्यक असेल,तर डोक्यावर टोपी किंवा रुमाल वापरावा आणि सावलीचा आधार घेत विश्रांती घ्यावी.बाहेर फिरताना जाड कपडे वापरण्याऐवजी सुती आणि फिकट रंगाच्या सैल कपड्यांचा वापर करावा.

उन्हामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन डिहायड्रेशनचा त्रास होऊ शकतो.त्यामुळे दिवसभरात किमान ५ ते ६ लिटर पाणी प्यावे.मळमळणे,चक्कर येणे,थकवा जाणवणे ही उष्माघाताची प्राथमिक लक्षणे आहेत.अशी लक्षणे दिसल्यास त्वरित सावलीत बसून लिंबू पाणी किंवा ओआरएस (जठड) सारखी पेये घ्यावीत.तसेच उन्हाळ्याच्या दिवसात मांसाहार (मटण, चिकन, मासे) तसेच चहा आणि मद्यपानाचे सेवन टाळावे,

अति उष्णतेमुळे त्वचा कोरडी पडणे,अंगाला खाज सुटणे किंवा लाल होणे असे त्रास उद्भवू शकतात. त्यामुळे शरीराची स्वच्छता राखावी. घरात राहताना खिडक्या उघड्या ठेवून खेळती हवा राहील याची दक्षता घ्यावी आणि शक्य असल्यास पंखे किंवा कुलरचा वापर करावा.लहान मुले, वयोवृद्ध आणि दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्तींनी उन्हात जाणे टाळावे. त्यांना उष्णतेचा त्रास लवकर होऊ शकतो, त्यामुळे त्यांची अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.

उष्माघाताने त्रस्त असलेल्या रुग्णांसाठी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयात एक स्वतंत्र वातानुकूलित (उ) कक्ष सज्ज करण्यात आला आहे. रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी सर्व तयारी करण्यात आली आहे.त्याचप्रमाणे,तालुक्यातील सर्व खाजगी डॉक्टरांनी आणि दवाखान्यांनीही उष्माघाताच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी आवश्यक सुविधा सज्ज ठेवाव्यात, तसेच उन्हाचा त्रास जाणवल्यास वेळ न घालवता जवळच्या सरकारी किंवा खाजगी डॉक्टरांशी त्वरित संपर्क साधावा, असेही वैद्यकीय अधीक्षक डॉ.अशोक राठोड यांनी केले आहे.

**तांबडे कुटुंबियांनी राजाचे,औक्षण करत होळकर वंशजांच्या ताफ्यास श्रिफळ वाढवून केला जल्लोष**

# होळकरांच्या करंजीत श्रिमंत द्वितीय तुकोजीराव होळकर जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : सालाबादप्रमाणे याही वर्षी करंजी ग्रामस्थ तसेच हिंदू धर्म रक्षक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जन्मोत्सव सोहळा समिती नाशिक यांच्या संयुक्त विद्यमानाने द्वितीय तुकोजीराव होळकर यांचा जन्म सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात प्रमुख मान्यवर म्हणून द्वितीय तुकोजीराव होळकर यांची वंशज श्रीमंत अभिमन्यू राजे होळकर उपस्थित होते. त्याचप्रमाणे मुकुंद राजे होळकर पंच भैय्या कमिटी इंदोर, आमय फडणीस, नवनाथ ढगे साहेब, समाधान बागल, डॉ.तुषार चिचोले,जलाल महाराज प्र, बिरार सर, प्रा. पाटील सर,बाळा पाडवी,यांसह जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते उपस्थित होते.

करंजी गावाचे वेशीवर तांबडे कुटुंबियांनी राजाचे,औक्षण करत होळकर वंशजांच्या ताफ्यास श्रिफळ वाढवून जल्लोष स्वागत झाले.

मल्हार तुकेश्वर महादेव मंदिरात अभिमन्यू राजे होळकर यांच्यायांच्या हातून अभिषेक करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. या प्रसंगी होळकर शाही अभ्यासक व्याख्याते रामदास काळे यांनी तुकोजीराव होळकर द्वितीय यांच्या जीवनातील अनेक पैलुंवर प्रकाश टाकला व उपस्थितांना मंत्रमुग्ध केले

**गावातील मंदिरे घाट यांची दुरुस्ती हो मी या ठिकाणी भव्य दिव्य असे स्मारक करण्यास राज्य सरकारमार्फत पाठपुरावा करणार तसेच या ठिकाणी भव्यदिव्य असे श्रीमंत महाराजा तुकोजी होळकर यांचे स्मारक व्हावे. गावाच्या भूमीत पाय ठेवल्यावरती आनंद झाला. या छोट्याशा गावातून महाराजांनी अखंड भारतभर सामाजिक शैक्षणिक कार्य करून गावाची ओळख निर्माण केली आणि करंजी गावाचा इतिहास भारतभर घेऊन गेले. या तुकोजी महाराजांचे मी अभिमन्यू राजे होळकर पाचव्या पिढीतील वंशज म्हणून आनंद होतो.**

**– अभिमन्यू राजे होळकर**
**द्वितीय तुकोजी होळकर यांचे वंशज**

या कार्यक्रमासाठी ग्रामस्थांनी विशेष प्रयत्न करुन आपल्या परंपरा सुरु करण्यासाठी जपण्यासाठी सार्वजनिक प्रयत्न करत असल्याचे सांगितले गावाच्या विकासासाठी प्रयत्न असुन तुकोजीराव होळकर यांचे स्मारकाची व यात्रेनिमित्त गरज पडणार्या काही मुलभुत सोइ आवश्यक असल्याने त्यासाठी प्रयत्न करण्यासाठी वंशजांना साकडे घातले.

करंजी येथे जन्म घेऊन इंदोरच्या होळकरी गादीवर राज्य करणारे श्रिमंत द्वितीय तुकोजीराव होळकर महाराज यांचा १९१ वा जन्मोत्सव सोहळा आनंदात पार पडला आधुनिक इंदोर नगरीची पायाभरणी करनारे राजे म्हणून तुकोजीराव होळकर महाराज यांच्या कडे पाहीले जाते त्यांच्या काळात इंदोरहुन रेल्वे ची सुरवात झाली शहराला पाणीपुरवठा स्वच्छता व रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देऊन इंदोर नगरी व होळकर राज्याच्या प्रजेसाठी सार्वजनिक काम करण्यासाठी तुकोजीराव होळकर यांचे नाव अजरामर आहे

**महाराजा श्रीमंत तुकोजीराव (द्वितीय) होळकर यांचे जन्मभूमीत; नतमस्तक होऊन जीवनात नवीन उमिद आणि प्रेरणा मिळते**

**– मुकुंद राजे होळकर**
**पंच भैय्या कमिटी इंदोर होळकर घराणे वंशज**

निफाड तालुक्यातील करंजी सह अनेक गावे होळकर राज्याच्या अंतर्गत होती आणि म्हणूनच गावांमध्ये ऐतिहासिक वास्तू बघावयास मिळतात करंजी गावात तुकोजीराव होळकर यांचे स्मरणार्थ मल्हार तुकेश्वर महादेव मंदिर उभारले गेले आहे तसेच होळकर राजघराण्यातील व्यक्तींनी गोदावरी नदीच्या काठावर सुंदर घाठ वसवलेला आहे अहिल्यादेवी होळकर यांनी बाधलेली धर्म शाळा आजही स्थितीत असुन मंदिर व धर्म शाळेवरील नक्शी अप्रतिम आहे

प्रसंगी सरपंच चित्रा तांबेकर उपसरपंच सविता आडसरे

सभापती सुरेश आडसरे उपसभापती राजेंद्र निंबाळकर सोसायटी बंडु आडसरे, शरद जोशी, काळु बोराडे, योगेश आडसरे, प्रकाश आडसरे, भास्कर तांबडे आदीं सह महाशिवरात्र यात्रा कमिटी तरुण वर्ग गावकरी हजर होते.

‘सर्वसामान्य माणूस हाच आपला ‘विठ्ठल’

# टेक वारीतून नागरिक-केंद्रित प्रशासनाचा वेगवान रोडमॅप राबविण्यावर भर : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ’टेक-वारी २.०’ अंतर्गत ’महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताहाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदनघाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : तंत्रज्ञानाचा अंतिम उद्देश हा सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ करणे आहे. सर्वसामान्य माणूस हाच आपला ‘विठ्ठल’ असून त्याच्या सेवेसाठीच टेक वारी आहे. केवळ तंत्रज्ञान नव्हे तर मानवी संवेदना, मानसिक आरोग्य, आत्मपरीक्षण आर्ट ऑफ हँडलिंग क्रिटिसिझम विषयही प्रशासनासाठी महत्त्वाचा आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या ’टेक वारी’ उपक्रमाच्या माध्यमातून राज्यात नागरिक-केंद्रित प्रशासनाचा वेगवान रोडमॅप राबविला जात असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शासन अधिक कार्यक्षम आणि सुलभ करण्यावर भर दिला जात असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मंत्रालयातील त्रिमुर्ती प्रांगणात सामान्य प्रशासन विभागातर्फे आयोजित ’टेक-वारी २.०’ अंतर्गत ’महाराष्ट्र प्रशिक्षण सप्ताह कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, केंद्र सरकारच्या क्षमता बांधणी आयोगाच्या अध्यक्ष राधा चौहान, सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही.राधा उपस्थित होते. कार्यक्रमास विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, प्रशासनात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागरिकांचे जीवन अधिक सुलभ करण्यासाठी ’टेक वारी’ हा उपक्रम आहे. ’टेक वारी’ ही संकल्पना वारीच्या सातत्यपूर्ण परंपरेप्रमाणेच प्रेरणादायी आहे. जसे वारकरी कोणत्याही परिस्थितीत पंढरपूरची वारी चुकवत नाहीत, तसेच आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात सातत्याने शिकणे अत्यावश्यक आहे. तंत्रज्ञान दररोज बदलत असून, ते आपण जर स्वीकारले नाही तर व्यक्ती काळाच्या ओघात मागे पडू शकतात. अक्षरज्ञानापासून इंटरनेटपर्यंत साक्षरेतेची व्याख्या विकसित झाली असून आता ती एआयपर्यंत पोहोचली आहे. ’ज्याला एआय समजते आणि वापरता येते, तोच खऱ्या अर्थाने आज साक्षर आहे’ असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एआयमुळे नोकरीच्या स्वरूपात मोठे बदल होणार असून, पुढील एक हजार दिवसात ८० ते ९० टक्के काम काजाचे स्वरूप बदलू शकते, असा अंदाज त्यांनी व्यक्त केला. तंत्रज्ञानाला घाबरण्याऐवजी ते स्वीकारण्याची गरज अधोरेखित करताना त्यांनी संगणक क्रांतीचे उदाहरण दिले. संगणकामुळे कार्यक्षमता आणि पारदर्शकता वाढली, तसेच मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल झाले. ’आयगॉट’ प्लॅटफॉर्मद्वारे राज्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण घेतल्याचा उल्लेख करत त्यांनी अभिमान व्यक्त केला. विशेषतः एआय आणि आधुनिक तंत्रज्ञान विषयांबाबत अधिकाऱ्यांनी दाखवलेली उत्सुकता ही सकारात्मक बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. विविध विभागांनी एआय आणि ब्लॉकचेनसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ही क्षमता योग्य प्रकारे वापरली, तर महाराष्ट्र




इतर राज्यांना मार्गदर्शन करू शकणारी कन्सल्टिंग क्षमता विकसित करू शकतो. एआय एजंट वासुदेव अत्यंत कार्यक्षम पद्धतीने काम करतात, त्यामुळे भविष्यात त्यांच्याशी स्पर्धा करण्यासाठी आपल्यालाही स्वतःची कौशल्ये सातत्याने अद्ययावत ठेवावी लागतील.

## अक्कलकोट येथे भाजपाचा विजयी जल्लोष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


अक्कलकोट : पश्चिम बंगाल, आसाम आणि पुदुच्चेरी विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या दणदणीत विजयाचा आनंद अक्कलकोट भाजपा कार्यालयात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



यावेळी फटाक्यांची आतषबाजी, मिठाई वाटप व घोषणाबाजी करत कार्यकर्त्यांनी विजयाचा जल्लोष केला. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वावर जनतेने पुन्हा एकदा विश्वास दाखवल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

उपस्थित मान्यवर :

भाजपा मंडल अध्यक्ष श्री प्रदीप पाटील, भाजपा पश्चिम मंडल अध्यक्ष श्री महादेव पाटील, पंचायत समिती सदस्य आप्पासाहेब किवडे, भाजप प्रदेश कार्यकारणी सदस्य शिवशरण जोजन, श्री प्रभाकर मजगे, शिवशरण वाले, संजय भागानगरे, उपनगराध्यक्ष श्री ऋतुराज राठोड, नगरसेवक रमेश कापसे, भिमराव शेळके, प्रवीण शहा, प्रथमेश इंगळे, अशोक जाधव, नागराज कुंभार, सचिन शिंदे, प्रशांत शिंपी, भारत भांडेकर, दयानंद रोडगे, स्वामीनाथ धनशेट्टी, लक्ष्मीकांत जोशी, रुद्रया स्वामी, देविदास गवंडी तसेच भाजपा महिला शहराध्यक्ष विजया गवंडी आदी उपस्थित होते.



## मीरा बोरवणकर यांची राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी अराजकीय व्यक्तीची निवड केल्याबद्दल सरकारचे धन्यवाद!

तरीही या पदावर निवृत महिला न्यायाधीश असायला हवी होती, परंतु अनपड राजकारणी व्यक्तीपेक्षा आयपीएस महिला असणे नकीच फायदेशीर आणि योग्य आहे!

आपल्या धडाकेबाज कार्यशैलीमुळे ’लेडी सुपरकॉप’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या निवृत्त पोलीस अधिकारी मीरा बोरवणकर यांची राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. प्रशासकीय आणि पोलीस दलातील प्रदीर्घ अनुभवाचा फायदा आता राज्यातील महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी होणार आहे.

मीरा बोरवणकर या भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) अत्यंत वरिष्ठ आणि अनुभवी अधिकारी आहेत. १९८१ च्या बॅचच्या अधिकारी असलेल्या बोरवणकर यांनी महाराष्ट्र केडरच्या पहिल्या महिला आयपीएस अधिकारी होण्याचा मान पटकावला होता. त्यांच्या पोलीस दलातील कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वाच्या प्रकरणांचा छडा लावून गुन्हेगारांवर वचक निर्माण केला होता.

पोलीस दलातील विविध उच्च पदे भूषवल्यानंतर आता त्यांच्याकडे राज्य महिला आयोगाची महत्त्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. महिलांचे हक्क, संरक्षण आणि सक्षमीकरण या क्षेत्रांत त्यांच्या निवडीमुळे मोठी सकारात्मक भर पडेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## बार्टी संस्थेच्या वतीने जाहीर आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेच्या वतीने २०२५ -२६ या वर्षी संस्थेच्या संशोधन विभागामार्फत माता भिमाई आंबेडकर: जीवन संघर्ष व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जडणघडणीतील योगदान -एक अभ्यास या शिर्षकाचा संशोधन प्रकल्प हाती घेतलेला आहे.

प्रस्तुत संशोधन विषयाबाबत माहिती असणारे संशोधक, अभ्यासक, विचारवंत, कार्यकर्ते आणि नागरीकांनी आपल्याकडे असलेली माहिती (मौखीक, कागदपत्रे, लेख, शोधनिबंध, ग्रंथ इ.) उपलब्ध करून दिल्यास संशोधन प्रकल्पाची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल. याकरिता आपल्याकडील माहिती दिनांक ३१मे २०२६ पर्यंत कार्यालयाच्या researchbarti2022gmail.com या ई-मेलवर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), २८, क्वीन्स गार्डन, कॅम्म, पुणे -४११०१ या कार्यालयीन पत्यावर पाठवून किंवा कार्यालयात प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन सहकार्य करावे. असे आवाहन बार्टी संस्थेच्या वतीने संशोधन विभागामार्फत करण्यात येत आहे. यासाठी येणारा झेरॉक्स, टपाल, प्रवासभाडे इ. कोणत्याही प्रकारचा खर्च अनुज्ञेय असणार नाही. आपण दिलेली माहिती सन्मानपूर्वक, योग्य पध्दतीने संदर्भासह प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

## कळंब मध्ये सर्वपक्षीय भीमसैनिकांचा तहसील कार्यालयावर अबकड उपवर्गीकरणाच्या विरोधात धडक मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : प्रतिनिधी, सुधाकर रणदिवे, दि. ४ सोमवार, कळंब तालुक्यातील सर्वपक्षीय भीमसैनिकांचा तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला.

अबकड उपवर्गी करणाच्या विरोधात हा मोर्चा काढण्यात आला होता.

त्या मोर्चाच्या प्रमुख मागण्या खालील प्रमाणे आहेत.

१) आरक्षण बचाव वर्गीकरण हटाव

२) जातीनिहाय जनगणना करावी

३) खाजगी क्षेत्रामध्ये आरक्षण लागू करावे

४) सर्व एससी जातीमधील ५९ जातीचा सखोल अभ्यास करावा.

५) एस सी चे आरक्षण १३% वरून २०% करावे

६) न्यायाधीशांच्या नियुक्तीमध्ये आरक्षण लागू करावे

या व इतर मागण्यासाठी सरकारला इशारा दिलेला आहे. जर का आरक्षणाला धक्का लागला आणि उपवर्गीकरण लागू झाले तर भीमा कोरे गाव चा इतिहास झाल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी अ ब क ड उपवर्गीकरण रद्द करा असा इशारा या मोर्चाच्या माध्यमातून सरकारला दिला आहे.

**तहसीलदाराच्या मार्फत भीमसैनिकांचा सरकारला कडक इशारा**

या मोर्चामध्ये प्रामुख्याने माजी नगरसेवक सुनील गायकवाड, प्रा.डॉ. संजय कांबळे सर, नगरसेवक अमर अण्णा गायकवाड, अनिल हजारे, सतपाल भाऊ बनसोडे , राहुल दादा हौसलमल, कुणाल दादा मस्के सुमित भैया रणदिवे, शिवाजी शिरसट, बंडूभाऊ बनसोडे, राजाभाऊ गायकवाड, धावारे सर, किशोर वाघमारे, अशोक कसबे,सुधीर बनसोडे, या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चासाठी कळंब तालुक्यातुन महिला, पुरुष, तरुण वर्ग, मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकातून तहसील कार्यालयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जय जय कार करत, मोर्चा काढण्यात आला. शेवटी डॉ. संजय कांबळे सर, माजी नगरसेवक सुनील गायकवाड, सतपाल भाऊ बनसोडे, अनिल हजारे, अशोक कसबे, नाईकवाडे, यांनी आपापले मनोगत व्यक्त करून, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.




## शावळ येथे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात संपन्न

# श्री परमानंद-यल्लालिंग यात्रा महोत्सव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील शावळ येथे श्री परमानंद-यल्लालिंग यात्रा महोत्सवाचे औचित्य साधून, श्री परमानंद-यल्लालिंग सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित ’सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा’ अत्यंत मंगलमय आणि उत्साही वातावरणात पार पडला.

सामाजिक एकात्मता, समता आणि बंधुभावाचा संदेश देणारा हा सोहळा उपस्थित जनसमुदायासाठी प्रेरणादायी ठरला.या सोहळ्यास नागणसूरचे डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामीजी यांची वंदनीय उपस्थिती लाभली.त्यांच्यासह श्री वीरभद्रेश्वर महास्वामीजी(आंदेवाडी बुद्रुक) ज्ञानसिंधू महाराज (आंदेवाडी बुद्रुक) वीर शिवलिंगेश्वर शिवाचार्य (कडबगाव) हवण्णा महाराज (सालूटगी)मिलन कल्याणशेट्टी,दादाराव ताकमोगे डॉ.अशोक हिप्परगे, लक्ष्मण पुजारी,सरपंच नितीन चव्हाण उपस्थित होते.



या सामूहिक विवाह सोहळ्याद्वारे अनेक वधू-वरांनी आपल्या संसाराचा नवा अध्याय सुरू केला. आर्थिकदृष्ट्या गरजू कुटुंबांना आधार देण्यासोबतच, जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन सामाजिक ऐक्य आणि सहकार्याची भावना वृद्धिंगत करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.या सोहळ्याचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल परमानंद-यल्लालिंग सामाजिक बहुउद्देशीय संस्थेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ‘बाप्या’ चित्रपटाच्या ट्रेलरमधील आक्षेपार्ह शब्द हटवला; संत रविदास सामाजिक प्रतिष्ठानच्या लढ्याला यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उल्लासनगर उल्हासनगर प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे : आगामी मराठी चित्रपट ’बाप्या’ च्या ट्रेलरमधील एका विशिष्ट शब्दावरून निर्माण झालेला वाद आता मिटला आहे. संत रविदास सामाजिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्री. गजानन लिंबोरे यांनी या शब्दावर तीव्र आक्षेप घेत लढा उभारला होता. समाजाच्या भावना लक्षात घेऊन चित्रपट निर्मात्यांनी सकारात्मक पाऊल उचलले असून, संबंधित आक्षेपार्ह शब्द आणि व्हिडिओ क्लिप सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरून हटवण्यात आली आहे.

नेमके प्रकरण काय?

काही दिवसांपूर्वी ’बाप्या’ चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित झाला होता. त्यामध्ये वापरण्यात आलेला एक वाक्प्रचार विशिष्ट समाजाच्या भावना दुखावणारा असल्याचे सांगत संत रविदास सामाजिक प्रतिष्ठानने विरोध दर्शवला होता. गजानन लिंबोरे यांच्या नेतृत्वाखाली प्रतिष्ठानने याविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती आणि निर्मात्यांकडे तो शब्द बदलण्याची मागणी केली होती.



गजानन लिंबोरे यांचे तीव्र आक्षेप

निर्मात्यांची भूमिका आणि कार्यवाही:

या विरोधानंतर चित्रपटाचे दिग्दर्शक आणि निर्मात्यांनी स्पष्ट केले की, कोणाच्याही भावना दुखावण्याचा किंवा कायद्याचे उल्लंघन करण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता. तरीही, सामाजिक सलोखा राखण्यासाठी त्यांनी तात्काळ कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार, आता अधिकृतपणे ही व्हिडिओ क्लिप काढून टाकण्यात आली आहे. तसेच चित्रपट प्रदर्शित होताना संबंधित भागात तांत्रिक बदल (म्यूट किंवा शब्द बदलणे) केले जातील, अशी ग्वाही निर्मात्यांनी दिली आहे.